# वारणा खोऱ्याचे भाग्य विधाते सहकार महर्षी तात्यासाहेब कोरे व्यक्ती आणि जीवनकार्य

**प्रा. श्री. अजित एकनाथ पाटील**
एम.ए.,एम.एड्.,डी.एस.एम.,सेट, पीएच.डी.(Pursuing)
तात्यासाहेब कोरे शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
वारणानगर, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि परिवर्तनाची जबाबदारी ग्रामीण नेत्यावर येवून पडली. महाराष्ट्राचा ग्रामीण नेतृत्वाच्या विकासात मोठा वाटा आहे. त्यातील महत्त्वपूर्ण अशा **पश्चिम महाराष्ट्राच्या विकासातील एक सुवर्णपान म्हणजे तात्यासाहेब कोरे होय. ज्यांनी वारणा खोऱ्याला वैभवशाली व समृद्ध बनविण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले.** आपल्या कार्यक्षमतेने सहकाराचा एक आदर्श नमुना संपूर्ण भारतापुढे निर्माण केला आहे. आणि या वारणा खोऱ्याच्या विकासासाठीचे उत्तम नेतृत्व तात्यासाहेब कोरे यांनी केले.

विश्वनाथ तथा तात्यासाहेब कोरे यांचा जन्म दि. १७ ऑक्टोबर १९१४ रोजी पन्हाळ्याच्या पायथ्याशी पूर्वेस व वारणा नदीच्या दक्षिणेस कोडोली या गावी झाला. ‘खूप कष्ट करायचे’ हा त्यांच्या घराण्याचा वारसाच होता. **‘कष्ट करून जे मिळेल ते खरे’** हे त्यांना अधिक प्रिय होते. गुरू श्रीधरपंताकडून त्यांना भारतीय स्वातंत्र्य चळवळी विषयी माहिती मिळत होती. भूमिगत क्रांतिकारकांना सहकार्य करणे, स्वत: स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेणे या भूमिका ही तात्यांनी पार पाडल्या. या कालावधीतच तात्यांच्या विचारांची जडणघडण होत होती. समाजातील आर्थिक विषमता, दारिद्र्य, जातिभेद या समस्या त्यांना साद घालत होत्या. **छ.शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात सामाजिक क्रांतीची प्रचंड लाट निर्माण केली होती, त्यांचा प्रभाव ही तात्यांच्या जडणघडणीत महत्त्वाचा ठरला.** क्रांतिसिंह नाना पाटील आणि त्यांचे प्रतिसरकार ही तात्या जवळून पाहत होते. प्रसंगी प्रतिसरकारच्या क्रांतिकारकांना आश्रय देण्याचे कार्य ही तात्यांनी केले.

वयाच्या २१ व्या वर्षी तात्यांनी सर्वोदय सहकारी सोसायटीच्या माध्यमातून गरजू लोकांना अत्यल्प व्याजदराने कर्ज पुरवठा करत त्यांची सावकारी पाशातून मुक्तता करण्यासाठी प्रयत्न केले. या कार्यातून त्यांना **‘सहकाराची मूलतत्त्वे सहकाराद्वारे कल्याणकारी लोकराज्य निर्माण करणे हे आहे,’** याची जाणीव झाली. **सन १९४० मध्ये तात्यांची कोडोली नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली.** शिक्षण, रस्ते आणि वैद्यकीय व्यवस्था यात सुधारणा करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

सन १९३९-४० मध्ये दुसऱ्या महायुद्धामुळे सर्वत्र अन्न-धान्याची टंचाई भासू लागली, तेव्हा कोडोली परिसरातील गोर-गरिबांसाठी पहिले स्वस्त धान्य दुकान तात्यांच्या पुढाकाराने सुरू झाले. सन १९३९ मध्ये कोल्हापूर संस्थानात प्रजा परिषदेने आंदोलन सुरू केले आणि तात्यांनी प्रजेच्या आंदोलनात स्वत:ला झोकून दिले. प्रजा परिषदेची सभा तात्यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या

मदतीने कोडोली येथे आयोजित केली होती. या सभेत त्यांनी **'शासनाचे कडक धोरण प्रजेच्या हिताचे नाही'** हे विस्तारपूर्वक स्पष्ट केले. परिणाम स्वरूप त्यांना कोल्हापूर संस्थांनी पोलीसाकडून त्रास दिला गेला.

सन १९४२ च्या छोडो भारत आंदोलनात तात्यांचा सहभाग होता, ते **९ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईच्या गोवालिया टँक मैदानावरती तिरंगा फडकविण्यासाठी यशवंतराव चव्हाण, के.डी.पाटील या आपल्या जिवलग मित्रांसह उपस्थित होते.** चलेजाव चळवळीत सहभागी होऊन मुंबईवरून परत येत असताना **'आपल्या वारणा खोऱ्यात स्वातंत्र्य चळवळीची मशाल धगधगती ठेवण्याचा निर्धार तात्यांनी केला.'** आणि पुढील काळात वारणा खोरे पेटून उठले. छोडो भारत चळवळीच्या महत्त्वाच्या घडामोडी घडत असताना वारणा नदीच्या काठावरील तात्यासाहेबांचा **'डाग मळा'** भूमिगत कार्यकर्त्यांचा भरवशाचा निवारा बनला. यशवंतराव चव्हाण, के.डी.पाटील, क्रांतिसिंह नाना पाटील, आत्माराम जाधव यांनी १९४२ ला प्रतिसरकारची सुत्रे या डागमळ्यातूनच हलवली. **प्रतिसरकारला सर्वोतोपरी मदत करण्याची उदात्त भूमिका कोरे कुटूंबियांनी चोख पार पाडली.**

थोर क्रांतिकारकांच्या बलिदानातून जनतेच्या क्रांतिकारी उठावातून मिळालेल्या स्वातंत्र्याचा १५ ऑगस्ट १९४७ हा प्रथम दिवस. तो सामाजिक समता राखून कसा साजरा करता येईल याची तात्यांनी आखणी केली. महात्मा गांधीजींच्या विचारांनी प्रेरीत होवून **सर्वजाती जमातींनी एकत्र येवून तिरंगा झेंड्याच्या साक्षीने मांडीस मांडी लावून एकत्र सहभोजनाचा कार्यक्रम करावयाचे त्यांनी निश्चित केले. यावरून त्यांचे जातिभेद निर्मुलनाचे कार्य अधोरेखित होते.**

सहकाराकडे ओढा असणाऱ्या तात्यासाहेबांनी आपले व्यक्तिमत्व जाणीवपूर्वक घडविण्याचा प्रयत्न केला. **ज्यांच्या पासून नवे काहीतरी शिकता येईल अशा व्यक्तींच्या सहवासात ते राहिले.** यशवंतराव चव्हाण, रत्नाप्पा कुंभार, नानासाहेब गोरे, डॉ. धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता या थोर व्यक्तींचा सहवास त्यांना लाभला. त्यातूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व घडत गेले. नेतृत्व फुलत गेले. **'अल्पभूधारक शेतकरी आणि जिरायती शेती करणारा सामान्य माणूस सहकारात कसा मोठा होईल'** याचा सतत विचार तात्या करत. सामान्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी सहकार चळवळ कशी रूजवता येईल हा एक विचार तात्यांच्या मनात येत असे. **स्वत:ची गुणवत्ता, ज्ञान, आत्मविश्वास, प्रचंड ध्येयवाद व अथक परिश्रम तसेच प्रचंड इच्छाशक्ती यामुळेच ते सहकारात मोठे योगदान देवू शकले.**

तात्यांनी सन १९५२ पासून साखर कारखाना उभारणीसाठी प्रयत्न सुरू केले. त्यांच्या प्रयत्नांना १ नोव्हेंबर १९५९ रोजी गाळप हंगामाच्या सुरूवातीने यश मिळाले आणि श्री वारणा सहकारी साखर कारखान्याचा शुभारंभ झाला. **वारणानगरी म्हणजे महाराष्ट्रातील साखर संस्कृतीला पडलेले एक सुंदर स्वप्न आहे,** असा तिचा गौरव झाला. तो तात्यासाहेबांच्या अथक प्रयत्नांमुळेच !

**तात्यासाहेब कोरेंचे योगदान–**

| | |
|---|---|
| १९५९ – | श्री वारणा सहकारी साखर कारखाना |
| १९६४ – | श्री वारणा विभाग शिक्षण मंडळ |
| १९६४ – | श्री यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय |
| १९६६ – | श्री वारणा सहकारी बँक |
| १९६८ – | श्री वारणा सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया संध लि. |
| १९६९ – | श्री वारणा विद्यामंदिर |
| १९६९ – | श्री वारणा विद्यालय |
| | श्री वारणा बालवाद्यवृंद |
| १९६९ – | श्री वारणा विभाग सत्कार्य संवर्धक मंडळ |
| १९६९ – | तात्यासाहेब कोरे ट्रस्ट |
| १९७० – | श्री वारणा महिला गृहउद्योग |
| १९७८ – | श्री वारणा बझार |

वारणा खोऱ्याच्या विकासासाठी आवश्यक शिक्षण हे ग्रामीण भागातील मुलांपर्यंत पोहचविणे आवश्यक होते. या पार्श्वभूमीवर तात्यांनी **१९६४ या वर्षी 'श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाची' स्थापना केली** व त्या अंतर्गत वारणा महाविद्यालयाची सुरूवात १९६४ साली झाली. तसेच व्यावसायिक शिक्षण देणारी शैक्षणिक संकुले उभा राहिली. **भागातील जवळपास ५० खेड्यातील मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न मिटला.**

मानवतेच्या आधारावर सामाजिक कार्याशी एकरूप होण्याची शिकवण मिळून, तसे आचरण घडवून आणण्याची प्रेरणा त्या शिक्षिताला शिक्षणापासून लाभली पाहिजे, हे तात्यांचे ध्येय होते. सहकारामुळे खेड्यांचा विकास होण्यास मदत झाली. साखर कारखाना, शैक्षणिक संस्था यामुळे रोजगार निर्मिती व ग्रामीण भागात शिक्षणाच्या संधी उपलब्ध केल्या. **'हवी ती किंमत देवून चांगली माणसे गोळा करा'** हा संस्थेच्या नावलौकिकासाठी तसेच गुणवंत विद्यार्थी घडविण्यासाठी तात्यांचा ध्यास होता. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची उणीव भरून निघावी म्हणून तात्यांनी १९६९ साली शिशुविहार ही पूर्व प्राथमिक शिक्षण देणारी आणि **श्री वारणा विद्यामंदिर** ही प्राथमिक शिक्षण देणारी संस्था सुरू केली. तर माध्यमिक शिक्षणासाठी **श्री वारणा विद्यालयाची** सुरूवात केली. माध्यमिक शिक्षणानंतर भागातील मुलांची सोय व्हावी म्हणून **तात्यांनी वैद्यकीय आणि तांत्रिकी, अभियांत्रिकी शिक्षण देणाऱ्या संस्थांची ही उभारणी केली.** माझ्या वारणा खोऱ्यातील मुला-मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी, शेतकऱ्यांची मुले मोठी व्हावीत, हीच तळमळ तात्यांची हे शैक्षणिक संकुल उभारताना होती.

वारणा विभागातील लोकांत विधायक कामांनी स्वत:ची व समाजाची सर्व बाजूंनी प्रगती करून घेण्याची वृत्ती जागृत करण्याचा निश्चय केला आणि तात्यांनी **'श्री वारणा विभाग सत्कार्य संवर्धक मंडळाची' स्थापना १९६९** साली करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. तिचा मानस होता, वारणा परिसरातील गावांमध्ये विधायक कार्याची सुरूवात करणे, या कार्यातून त्यांना **ग्रामोन्नती** साधावयाची होती. तात्यांनी नैसर्गिक आपत्ती, परदेशी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, गरजू लोकांना सहाय्य, सांस्कृतिक, कलात्मक आणि सृजनात्मक कार्याला आर्थिक मदत करण्यासाठी **'श्री तात्यासाहेब कोरे पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट'**ची स्थापना केली.

सर्वसामान्य जनतेचा आर्थिक विकास व्हावा तसेच सर्वसामान्य माणसाच्या हाती त्यांच्या मालकीची अर्थोत्पादनाची साधने दिली पाहिजेत, या हेतूने तात्यांनी १९६६ साली **'श्री वारणा सहकारी बँक, वारणानगर'** ची स्थापना केली. सामान्य माणसाच्या मालकीच्या वारणा सहकारी बँकेची शक्ती वाढावी आणि कृषी, औद्योगिक समाजरचनेच्या दिशेने तिने सातत्याने व खंबीरपणे वाटचाल करावी, ही बँक सुरू करण्यामागील भूमिका होती.

ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी शेतकऱ्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी, दुग्ध व्यवसायाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी तात्यांनी **'श्री वारणा सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया संघ लि.'** या नावाची सहकारी संस्था १९६८ साली उभारली. तात्यांनी लावलेल्या या **रोपट्याचा आज मोठा वटवृक्ष झाला आहे.** अमृत दुग्ध प्रकल्पातंर्गत तयार होणाऱ्या दुग्ध उत्पादनांना जगभर मोठी मागणी आहे.

स्वावलंबनामुळे व्यक्तीला बहुमान मिळतो. समाजात पुरूषांइतकाच स्त्रियांना स्वावलंबी बनण्याचा हक्क आहे. **स्वावलंबनामुळे महिलांचा आत्मविश्वास वाढेल या विचाराने तात्यासाहेबांनी महिलांच्या जीवनात सहकारी तत्त्वावरील एका गृह उद्योगाचा प्रारंभ केला.** हाच महिला गृहउद्योग अनेक महिलांना आजही स्वावलंबी बनवत आहे. **'वारणा भगिनी मंडळ' हा याच वारणा सहकार परिवाराचा घटक ज्याने शेकडो स्त्रियांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली.**

तात्यांनी वारणा खोऱ्यात ग्राहक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी **'वारणा बझार'** ही संकल्पना पुढे आणली. त्या माध्यमातून गृहपयोगी, दर्जेदार विविध वस्तू

वाजवी दरात उपलब्ध करून दिल्या. आज **वारणा बझारच्या ५७ शाखा वारणा विभागात सेवा बजावत आहेत.**

आज सर्वजण त्यांच्या उत्तुंग नेतृत्वाकडे आदराने आणि आदर्श म्हणून पाहतात.

***एकमेकां सहाय्य करू । अवघेचि धरू सुपंथा ।।***

या संत तुकारामांच्या उक्तीप्रमाणे वारणा विविध उद्योग व शैक्षाणिक समूहाच्या माध्यमातून तात्यासाहेबांनी आपल्या कार्यक्षमतेने सहकाराचा एक आदर्श संपूर्ण भारतापुढे निर्माण केला आहे.

एक दिवा सहस्त्र दिवे पेटवू शकतो, स्वत:ला जाळून जगाला प्रकाश देण्याची प्रेरणा दिवा आपणास देतो. त्यास अनुसरून माणसाने जगाचा अंधार हटविण्यासाठी आणि सम्यक विचारांचा प्रकाश पसरविण्यासाठी अखंड कार्यरत राहिले पाहिजे. या विचारसरणीनुसार **तात्यासाहेब कोरेंनी आपले संपूर्ण आयुष्य जनकल्याणार्थ वेचले.** लोककल्याणार्थ आयुष्यभर झटलेल्या या सहकारमेरूची २७ वी पुण्यतिथी १३ डिसेंबर रोजी आहे, त्यांना शतशः नमन !

**वारणा खोऱ्यातील ८० खेड्यांच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न तात्यांनी पाहिले आणि ते सत्यात उतरविले.** तात्यासाहेबांच्या कार्याची ज्योत अखंडपणे त्यांचे वारसदार **मा.आ.डॉ. विनयरावजी कोरे यांनी अखंडपणे तेवत ठेवली आहे. तात्यासाहेबांनी सुरू केलेल्या सामाजिक, सांस्कृतिक, औद्योगिक आणि शैक्षणिक कार्याचा डोलारा त्यांनी समर्थपणे व आदर्शवत चालवला आहे.**

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१) मी एक कार्यकर्ता, तात्यासाहेब कोरे षष्ठयब्दी कमिटी १९७४, पूर्वाध, उत्तरार्ध

२) आण्णासाहेब शिंदे, मा.वि.आ. तथा तात्यासाहेब कोरे ७५ अमृतमहोत्सव स्मरणिका १९९४, प्रकाशक स.आ. गुळवणी

३) नाडगोंडे गुरूनाथ, अमृतरंग, सन १९७४ ते १९८४ या दशकातील तात्यासाहेब कोरेंचा व्याख्यान संग्रह.

४) पाटील राम, सहकार वैभव, १६ ऑगस्ट १९६६, लेखसंग्रह

५) धवलक्रांती, श्री वारणा सह. दुध उत्पादक प्रक्रिया संघ, अमृतनगर, रौप्यमहोत्सवी स्मरणिका सन १९९१.

६) वार्षिक विशेषांक

७) स्मरणिका